DJRKKN-20012/28/2026-O/O DJR-ADM-KONKAN 1/2410355/2026

सहकारातून समृध्दीकडे

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.रत्नागिरी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग,नवी मुंबई यांचे कार्यालय**

कोकण भवन, ३ रा मजला, कक्ष क्रमांक ३०८, नवी मुंबई ४०० ६१४

दुरध्वनी क्र. २७५७१३९५/९६ Email Id :djrkkn@gmail.com

**प्रथम प्राधान्य अत्यंत तातडीचे** जा.क्र.विसनि/कोकण/वि-७/रत्ना.जिमस बँक/निवडणूक/ठराव पाठविणे/ /२०२६/02

दिनांक :- ०७/०८/२०२६

प्रति,

अध्यक्ष/सचिव/व्यवस्थापक

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

**विषय :- रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँक लि. रत्नागिरी या बँकेच्या सन २०२६-२०३१ या कालावधीच्या संचालक मंडळाचे निवडणूकीसाठी प्रतिनिधीचे ठराव पाठविणेबाबत.**

संदर्भ :- १. मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्रं.रासनिप्रा/जिल्हा सनिअ आदेश/४६/२०१५ दि.०२/०१/२०१५

२. मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.रासनिप्रा जिसनिअ/अधिकारी प्रदान/४७/सन२०१५ दि.०२/०१/२०१५

३. मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्रं.रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूका सुरू करणे/आदेश/७२५/२०२६, दि.२४/०२/२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयाकडे आपले लक्ष वेधण्यांत येत आहे.

2/- संदर्भीय पत्रातील सुचनेनुसार निम्न स्वाक्षरीत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई यांची रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकलि. रत्नागिरी या बँकेच्या संचालक मंडळाचे निवडणूकीसाठी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम १०(२) नुसार आपले संस्थेच्या प्रतिनिधीचा ठराव **दि. १४/०८/२०२६ ते १५/०९/२०२६** या कालावधीत सादर करावयाचा आहे. सदर निवडणुकोकरीता राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने दि. **२१/११/२०२३** हा अर्हता दिनांक घोषित केलेला आहे. यामुळे ज्या संस्था **दि. २१/११/२०२३** पर्यंत बँकेच्या सभासद झालेल्या आहेत, अशाच सभासद सहकारी संस्था मतदानासाठी ठराव पाठविण्यासाठी पात्र असतील. सदर प्रतिनिधीचा ठरावासाठी उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेच्या संचालक मंडळाची/अधिमंडळाची बैठक बोलाविण्यात यावी. सदर सभेची नोटीस सर्व संचालकांना पोहोच करण्याची जबाबदारी संस्था सचिवांची असेल. सभेत उपस्थित संचालकांची हजेरी पटावर स्वाक्षरी घेऊन अनुपस्थित संचालकांची तशी नोंद हजेरी पटावर घ्यावी. **सदर सभेत प्रतिनिधीचा ठराव पारित करून सदर ठरावाची सत्यप्रत संबंधीत तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था / सहकारी अधिकारी श्रे-१, सहकारी संस्था यांचे कार्यालयात दि. १४/०८/२०२६ ते १५/०९/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सादर करावी.** प्रतिनिधीचा ठराव पारित करणेपुर्वी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७(१०) व संलग्न कलम ७३ कअ ची तरतुद विचारात घेऊन पारित करावा. सदर तरतुदीनुसार प्राथमिक कृषी पत पुरवठा सहकारी संस्था वगळता इतर सभासद संस्था जिल्हा बँकेच्या कलम २७(१०) नुसार थकीत असल्यास त्या संस्था मतदानास पात्र असणार नाहीत. त्याचप्रमाणे **रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.रत्नागिरी** बँकेची सदस्य असलेली प्राथमिक कृषी पत पुरवठा सहकारी संस्था थकीत असेल तर अशा संस्थांचे संचालकाऐवजी सदर संस्थेच्या थकबाकीदार नसलेल्या एखादया

सदस्याचा प्रतिनिधी म्हणून समावेश करण्याचा ठराव किंवा जर सदरची संस्था थकबाकीदार नसेल तर सदर संस्थेच्या संचालक मंडळ सदस्याचाही ठराव करता येईल. वर नमुद दोन पैकी एकाचा ठराव करावा.

एका संस्थेने एकच ठराव पारित करणे आवश्यक आहे. एकाच संस्थेमध्ये एकापेक्षा जास्त ठराव पारित करण्याची प्रवृत्ती आढळून आल्यास किंवा इतर कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आली तर या संस्थेचे सचिव/व्यवस्थापक/पदाधिकारी कायदयातील कलम १४६(ई-२)(ह-१)(के)(प) व (क्यू) अन्वये अपराध असल्याने त्यानुसार फौजदारी कारवाईस सदर संस्था पात्र ठरतील याची नोंद घ्यावी. निवडणूक नियमाचे कलम १०(४) नुसार एकदा पाठविलेल्या प्रतिनिधीचा ठराव बदलता येणार नाही. परंतु प्रतिनिधीचा मृत्यू झाल्यास अथवा संचालक मंडळाची निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ गठीत झाल्यासच ठरावात बदल करून नवीन प्रतिनिधीचे नांव सुचविता येईल.

प्रतिनिधीत्वाचा ठराव आपले तालुक्याचे संबंधीत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था/सहकारी अधिकारी श्रेणी -१, सहकारी संस्था यांचेकडे सादर करताना सदर ठरावाच्या ४ सत्यप्रतीसह संचालक मंडळाच्या सभेचे इतिवृत्त, सभेच्या नोटीसीची प्रत व संचालकांच्या हजेरी पटाची प्रत सादर करावी व ठराव सादर करतेवेळी याबाबतचे मुळ दप्तर संबंधीत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,/ सहकारी अधिकारी श्रेणी-१, सहकारी संस्था यांना उपलब्ध करून दयावे. या पत्रासोबत द्यावयाच्या ठरावाचा नमुना व संस्थेचे सचिव/व्यवस्थापक यांनी द्यावयाच्या प्रमाणपत्राची (दाखल्याची) प्रत जोडलेली आहे. दि. १५/०९/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त होणारे ठराव स्वीकृत केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सोबत — सहपत्रे.**

Digitally signed by
Adinath Lahanu Dagade
Date: 07-08-2026
15:44:58

**(आदिनाथ दगडे)**
**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी,**
**रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँक लि.रत्नागिरी**
**तथा विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई**

**प्रत -**

१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी
२/- यांना वरील प्रमाणे योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.रत्नागिरी

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

मा.सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे